MHGA030005492026

**<u>न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, गडचिरोली, जि. गडचिरोली यांचे न्यायालय</u>**
(श्रीमती व्ही. आर. मालोदे यांचे समक्ष)

<u>किरकोळ फौजदारी अर्ज क्र.४२/२०२६</u>

अजय अरूण चिचघरे,
वय २४ वर्षे, धंदा मजुरी,
रा.खरपुंडी, तह.जि.गडचिरोली. ... अर्जदार

-विरुध्द -

महाराष्ट्र शासन मार्फत
पोलीस स्टेशन, गडचिरोली,
गडचिरोली,ता.जि.गडचिरोली. .... गैरअर्जदार

---

अर्जदारातर्फे विधीज्ञ : श्री यु.व्ही.कुकुडकर
गैरअर्जदारातर्फे विधीज्ञ : सहा.सरकारी अभियोक्ता

---

**<u>आदेश(नि.क्र.१)</u>**
(दि.१८/०३/२०२६)

अर्जदाराने या अर्जाव्दारे गुन्हा क्र.१९९/२०२६, महाराष्ट्र दारूबंदी कायदयाचे कलम ९८,८३,६५(अ) अंतर्गत गैरअर्जदाराने जप्त केलेली अर्जदाराचे मालकीचे टाटा हॅरिअर चारचाकी वाहन क्र.यु.पी.१६.डीबी.०५९० सुपुर्दनाम्यावर कलम ५०३ भारतिय नागरीक सुरक्षा संहिता अन्वये परत मिळावी अशी विनंती केली आहे.

०२. पोलीस स्टेशन, गडचिरोली यांनी सदरील प्रकरणात आपला जबाब निशानी ५ नुसार आणि विशेष सहा. सरकारी अभियोक्ता यांनी त्यांचे म्हणणे नि.क्र.१ वर दाखल केले. सदरचे जप्त वाहन अर्जदाराचे ताब्यात देण्याबाबत त्यांनी हरकत घेतली सदर वाहन अर्जदारला परत केल्यास पुन्हा अशाच प्रकारचे गुन्हे घडविण्याकरिता वाहनाचा उपयोग होईल यामुळे त्यांनी अर्ज खारीज करण्याची विनंती केली.

०३. अर्जदाराचे विधीज्ञ व विशेष सहायक सरकारी अभियोक्ता यांचे म्हणने ऐकले. अर्जदाराचा अर्ज, पोलीस स्टेशन, गडचिरोली, विशेष सहायक सरकारी अभियोक्ताचे कथन, तसेच प्रकरणातील अभिलेख या सर्वांचे अवलोकन केले. अर्जदाराने छापिल पहिली खबर, जप्त वाहनाचे नोंदणी प्रमाणपत्र, वाहनाचा विमा, वाहन अर्जदाराच्या नावाने संबंधीत कंपनीकडून स्थालातंरीत केल्याबददलचे प्रमाणपत्र शपथपत्रासह व अर्जदारचे आधारकार्डची प्रत दाखल केले आहे. सदर दस्तावरून असे दिसून येते की, जप्त वाहन हे सुरवातीला संबंधीत कंपनीच्या नावे असून ते आता अर्जदाराच्या नावाने स्थलातंरीत करण्यात आले. वरील कागदपत्रावरुन असे दिसुन येते की, गुन्हा क्र. १९९/२०२६ मध्ये जप्त केलेले वाहन हे अर्जदाराच्या मालकीचे आहे. सदरचे वाहन पोलीस स्टेशनमध्ये राहिल्यास ते खराब होण्याची शक्यता नाकारता येणार नाही. तसेच अर्जदाराने न्यायालयाने घालून दिलेल्या अटी मान्य करण्याचे शपथेवर प्रतीपादन केले आहे. त्यामुळे, अर्जदार वरील वाहनाचा अंतरिम ताबा घेण्यास हक्कदार आहे. म्हणून मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## <u>आदेश</u>

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. गैरअर्जदारास निर्देशीत करण्यात येते की, गुन्हा क्र.१९९/२०२६, महाराष्ट्र दारुबंदी कायदयाचे कलम ९८,८३,६५(अ) अंतर्गत गैरअर्जदाराने जप्त केलेली अर्जदाराचे मालकीचे टाटा हॅरिअर चारचाकी वाहन क्र.यु.पी.१६.डीबी.०५९० अर्जदार रुपये ८,००,०००/- (अक्षरी रु.आठ लाख फक्त) रक्कमेचे नुकसान भरपाई हमीपत्रावर खालील अटीन्वये देण्यात यावे.

अ. तपासी अंमलदार, पोलिस ठाणे गडचिरोली यांना असे निर्देशीत करण्यात येते की, त्यांनी सदरील वाहन अर्जदाराला देण्यापुर्वी त्याचा योग्य पंचनामा करुन जप्त केलेल्या वाहनाचे छायाचीत्र काढून घ्यावे व प्रकरणात दाखल करावे.

ब. अर्जदारास असे निर्देशीत करण्यात येते की, त्याने सदर वाहन चांगल्या स्थितीत ठेवावे, सदरहू वाहनाची विक्री करु नये व वाहनामध्ये कोणताही बदल करु नये. जेव्हा आवश्यकता भासल्यास तेव्हा न्यायालय निर्देश करेल त्याप्रमाणे न्यायालयात हजर करेल या अटीवर वरील वाहन अर्जदारास सुपुर्दनाम्यावर (नुकसान भरपाई हमीपत्रावर) परत करण्यात येते.

क. अर्जदारास असे निर्देशीत करण्यात येते की, त्याने संबंधीत गुन्हयाचे तपासी अधिकारी यांचे समक्ष गुन्हयाच्या तपासाकामी त्यांचे निर्देशाप्रमाणे हजर रहावे व तपासी अधिकारी यांना सदरील मुद्देमालाचे आवश्यक कागदपत्रे सुपुर्द करावे.

ड. जप्त वाहन हे सुपूर्द केलयानंतर अर्जदाराने त्याचे नावाने सदर वाहन नोंद झाल्याबददलचे नोंदणी प्रमाणपत्र १५ दिवसाच्या आत पोलीस स्टेशनमध्ये आणि अभिलेखावर दाखल करावे.

३. सुपूर्दनामा हा पोलीस स्टेशनमध्ये देण्यात यावा.

४. सदरील आदेशाची प्रमाणीत नक्कल गुन्हा क्र.१९९/२०२६ यामध्ये संबंधीत कागदपत्रांसोबत त्वरीत लावण्यात यावी.

५. तपासी अंमलदार यांना निर्देशित करण्यात येते की, त्यांनी दोषारोप-पत्रासोबत वाहनाचे आवश्यक कागदपत्रे तसेच छायाचित्र, सुपूर्तनामा बॉन्ड जोडावे.

VASANTI RAGHUNATH MALODE

Digitally signed by VASANTI RAGHUNATH MALODE
Date: 2026.03.20 10:31:15 +0530

ता.१८/०३/२०२६

(व्ही. आर. मालोदे)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
गडचिरोली.